नि
८९

सोलापूर येथील

# इंडियन फंडाचें प्रसिद्धिपत्र.

पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत छापिलें.

# सन १८८९ सालाकरितां प्रस्तावना.

सदर फंडाचे उत्पादक यांजकडून सर्व देशबांधवांस व विशेषतः पुणें, मुंबई इत्यादि ठिकाणच्या व तसेंच सोलापूर जिल्ह्याच्या लोकांस कळविण्यांत येतें कीं आमच्या आरंभिलेल्या उद्योगास तिसरें वर्ष लागलें असून आपण मनापासून जो आम्हांस आश्रय दिला व फंडाची रचना चांगल्या मजबूत पायावर करण्याचे कामीं जी योग्य सल्लामसलत दिली त्याजबद्दल आम्ही आपले फार आभारी आहों आजपर्यंत जरी ह्मणण्यासारखी वर्गणी जुळली नाहीं तत्रापि प्रस्तुत उद्योगापासून होणारे लाभ वगैरे जसजसे लोकांस जास्त कळूं लागतील तसतशी अधिकाधिक वर्गणी जमा होऊन उद्योगास सफलता प्राप्त होईल अशी पूर्ण आशा आहे.

# इंडियनफंड.

## (फक्त विद्यावृद्धीच्या कामीं लावण्याकरितां जमविणें तो.)

वरील उद्योगाचे पुरस्कर्त्यांस त्यांच्या उद्योगारंभास हल्लीं तिसरें वर्ष सुरू झालें आहे हें सर्व देशबांधवांस कळविण्यास फार आनंद वाटतो. सर्व हिंदुलोकांस त्यांत मुख्यत्वेंकरून मुंबई, पुणें व सोलापूर या जिल्ह्यांतील ज्या ज्या मंडळींनीं हा उद्योग दृढ पायावर उभारण्याकरितां उदार आश्रय दिला, व योग्य सुचनाद्वारें साह्य केलें, व या उद्योगांत स्वतः सामील झाले, याबद्दल त्यांचे ते खरे व अंतःकरणपूर्वक आभार मानतात. आणि जमलेली वर्गणी हल्लीं जरी थोडी आहे तरी या उद्योगाचीं मूलतत्वें व त्यांपासून होणारे फायदे या बद्दलची माहिती जसजशी लोकांस होत जाईल तसतशी फंडाचे रकमेची बढती त्वरित होत जाईल अशी ते आशा बाळगितात. व या आशेवरच ते पुढें दिलेलें विनंतिपत्र आपल्या सर्व देशबांधवांस सादर करीत आहेत.

**विनंतिपत्र.**

**प्रिय देशबांधव यांस !**

देशबांधव हो ! पश्चिम हिंदुस्थानांत थोडे दिवसाखालीं **इंडियनफंड** या नांवाचा एक फंड उभारण्याची खटपट सुरू झाली असून त्यासंबंधानें सोबतचे माहितीचे कागद आपणांकडे पाठविले आहेत. महाराज, आपण या देशामध्यें असलेले नानाजातींचे लोक यांचें कल्याण व्हावें अशी इच्छा निर्विवाद करित आहां ; व त्याचप्रमाणें आपणांपैकीं जे कुटुंबवत्सल आहेत, ज्यांस मुलेंबाळें आहेत, अशा लोकांस आपल्या मुलांबाळांचें कसें चालेल, त्यांचें हित होण्याचा मार्ग कोणता, याविषयीं काळजी आहेच आहे. तरी आपणां सर्वांस एवढी प्रार्थना आहे कीं, आपण मेहेरबानी करून फंडास स्वतः व आपले इष्टमित्र व बांधव यांच्याकडून होईल तितकी मदत करावी व सोबतचे लेखांत जे मुद्दे काढिले आहेत त्यांजविषयीं योग्य लक्ष्य पुरवून मोठ्या काळजीनें विचार करावा.

ज्या ज्या ठिकाणीं हा फंड उभारण्याची खटपट सुरू होईल त्या त्या ठिकाणीं व्यर्थ गडगडाट न करितां, खटपट करणें ती धिम्मेपणें व शांतपणें गवगवा न करितां सुरू केली असतां बरें ; तथापि फंडाचा कांहीं पैसा जमा झाला ह्मणजे वर्तमानपत्रांतून फंडाबद्दलची माहिती प्रसिद्ध करणें इष्ट असून ती प्रसिद्ध केली जाईलच. एकदोन ठिकाणीं सदर फंडाचा उपक्रम झाला तो प्रकार येणेंप्रमाणें :— कांहीं मित्रमंडळी एके ठिकाणीं जमून त्यांनीं फंडापासून होणारे लाभ यांविषयीं वादविवाद करून नियम ठरविले; नंतर एक अध्यक्ष, कांहीं उपाध्यक्ष यांच्या नेमणुका केल्या ; मुख्य चार जातींच्या लोकांपैकीं ट्रस्टी नेमिले ; एक सेक्रेटरी नेमिला व त्यांच्या हाताखालीं कांहीं सबसेक्रेटरींच्या नेमणुका केल्या, आणि नंतर वर्गणी

जमा करण्याचें काम सुरू केलें. याप्रमाणेंच इतर ठिकाणींही आरंभ करतांना त्याविषयीं विशेष गडबड न करतां त्याचा उपक्रम थोडक्यांतच करावा; कारण आरंभीं हा उपक्रम क्षुल्लक दिसला तरी त्याच्या अंगीं वर्धकता आहे व तो हळूहळू जोरावेल ही गोष्ट सर्वांनीं लक्षांत वागवावी.

ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह बॉडी ह्मणजे अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे काम करणारी मंडळी. यांनीं मोठ्या दिलदारपणानें आपलीं कामें करावीं व ज्या तत्त्वांवर सदर फंडाची रचना आहे त्या तत्त्वांचें उल्लंघन होऊं न देतां त्यांनीं निरनिराळ्या जातींच्या लोकांत जेणेंकरून फूट होणार नाहीं व जात्यभिमानास सवड मिळणार नाहीं, अशा प्रकारचें वर्तन ठेवावें, व ती मंडळी तसें वर्तन ठेवील अशी उमेद आहे. आणखी दुसरी गोष्ट अशी आहे कीं, फंडाचे जे पुरस्कर्ते आहेत ते मोठ्या मेहनतीनें व उत्साहानें काम करतीलच, तथापि त्यांनीं आपलें नांव पुढें मिरवूं नये; कारण नांव मिरवण्याचा प्रयत्न केला असतां विनाकारण तंटा व चुरस उत्पन्न होणार आहे. फंडाचा प्रत्येक वर्गणीदार हा आश्रयदाता समजला जाईल. ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह बॉडीनें ह्मणजे फंडाचे व्यवस्थापक लोकांनीं आणखी एक गोष्ट संभाळली पाहिजे; ती ही कीं, प्रथमतः त्यांनीं आरंभिलेल्या उद्योगावर कोणीं खरमरीत टीका केली असतां ती निमूटपणें सहन करून त्यास कांहीं उत्तर देऊं नये ; आपल्या उद्योगाचीं फळें अवलोकन केल्यावर विरुद्ध लोकांचीं तोंडें आपोआप बंद होतील अशा समजुतीवर स्वस्थ बसावें. परंतु विरुद्ध पक्षाच्या लोकांचा विरुद्धपणा जाऊन त्यांची अनुकूलता आहे असें दिसून येईल त्यावेळेस त्यांनीं कोणत्याही प्रकारें मदत केली असतां तिचा आनंदानें स्वीकार करावा.

फंड जमाकरण्याचें काम पुढील मुद्यांकडे योग्य लक्ष पुरवून चालविलें आहे, व फंडाचे नियमही त्यांच्या अनुरोधानें केले आहेत.

| हिंदुलोकांस प्रतिकूल अशा गोष्टी. | हिंदुलोकांस अनुकूल अशा गोष्टी. |
| --- | --- |
| १. जगाच्या सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकांशीं तुलना करून पाहिलें असतां हिंदुस्थानांतील लोक हे फार मागें आहेत ह्मणून त्यांच्यानें सुधारलेल्या राष्ट्रांशीं बरोबरी करवत नाहीं. | १. तथापि विद्येमध्यें, कलाकौशल्यामध्यें, व हरएक हुनरीमध्यें आंगमेहनत व बुद्धि यांच्या योगानें प्राविण्य मिळविण्यास त्यांच्यांत सामर्थ्य आहे. या गोष्टीस प्रसंतर फार लांब नाहीं. अर्वाचीन काळीं कलाकौशल्यांत व विद्येच्या कामांत युरोपांतील व अमेरिकेंतील राष्ट्रें जीं इतकीं उदयास आलीं आहेत, त्यांच्या विद्येचा वगैरे पाया ज्या आर्य व इतर पूर्वेकडील लोकांनीं घातला त्याच आर्य लोकांचे हिंदुलोक हे वंशज होत. |
| २. हल्लींच्या निकृष्ट स्थितीचें निर- | २. तथापि अन्य रीतीनें आपली |

सन होण्याकारितां हिंदुस्थानांतील लोकांस कलाकौशल्यांत व विद्येमध्यें सुधारलेल्या राष्ट्रांची बरोबरी करून त्यांच्याशीं जेणेंकरून टक्कर मारतां येईल अशीं शिक्षणसाधनें हिंदुस्थानांत असावींत तशीं नाहींत. आणखी असें कीं, अशीं साधनें पैदा करण्यास जितका पैसा लागणारा आहे तितक्या पैशाचा पुरवठा करण्यास लोकांजवळ त्राण नाहीं.

३. परंतु असा उपक्रम करण्याचें मनांत आणिल्यास त्यास द्रव्याची अनुकूलता पाहिजे. ही अनुकूलता कायमची व शाश्वत होण्यास्तव एक युक्ति आहे. ती ही कीं, या कामाकारितां एक फंड जमा करून त्या फंडाच्या फक्त व्याजांतून सर्व आवश्यक खर्च भागवावा; तथापि एका मनुष्यापासून या कामीं लागणारा सर्व पैसा मिळणें म्हटलें ह्मणजे हल्लीं एतद्देशीय लोकांची दैन्यावस्था मनांत आणिली असतां दुरापास्त गोष्ट समजली पाहिजे.

४. प्रत्येकानें वर्गणी देणें ती जरी इतकी थोडी आहे, तरी अशा उपक्रमापासून होणारे फायदे बहुतेक सर्व लोकांस त्यांच्या अज्ञानामुळें समजण्याची पंचाईत आहे, व त्यामुळें जशी वर्गणी जुळावी तशी जुळणार नाहीं.

स्थिति हटकून सुधारण्यास हिंदुलोकांस सुलभ असे दुसरे उपाय आहेत. ते उपाय ह्मटले ह्मणजे आपल्यांतील हुषार व होतकरू विद्यार्थी, पश्चिमेकडील सुधारलेल्या राष्ट्रांतून आयतीं उत्तम विद्यालयें आहेत, त्या विद्यालयांतून विद्यासंपादन करण्याकारितां पाठविणें वगैरे हे होत. आणि हे विद्यार्थी अभ्यास पुरा होऊन स्वदेशीं परत आल्यावर पुष्कळ गोष्टींची उणीव भरून येईल व आपल्या देशबांधवांची स्थिति सुधारून त्यांस बरे दिवस येण्याचे अनेक मार्ग ते शोधून काढतील.

३. ह्या देशाची जरी फार गरिबी आहे तथापि लोकसमुदाय मोठा आहे, आणि फंड जमा करणें तो सर्व देशभर लोकांकडून अगदीं अल्पस्वल्प वर्गणीच्या रूपानें मदत घेऊन जमा केला असतां एकंदर या कामीं लागणारी रक्कम सहजरीत्या मिळून जाईल. सबब प्रत्येकापासून फक्त एकवार त्याच्या महिन्याच्या प्राप्तीवर रुपयापाठीमागें अर्धा आणा वर्गणी घ्यावी, व अशी वर्गणी घेऊन फंड जमा करावा अशी सूचना आहे.

४. तथापि सर्व लोकसमुदायामध्यें जेथें तेथें कांहीं सुशिक्षित लोक सांपडतीलच सांपडतील. त्यांनीं अज्ञान लोकांची सदर गोष्टींविषयीं समजूत घालून देण्याचें मनावर घेतल्यास हवे तितके वर्गणीदार मिळतील. उदाहरणार्थ प्रत्येक जिल्ह्यांत असे सुशिक्षित लोक किंवा सबसेक्रेटरी ६० तयार झाले व प्रत्येकानें, सरासरी रुपया देणारे, असे ५०० वर्गणीदार मिळविले तर ३०,००० रुपये हालोहाल उभे राहून एक कायमचा फंड होईल.

५. मात्र इतकेंच कीं हा हेतु साधण्यासाठीं लोकांमध्यें एक जूट पाहिजे आहे, पण हल्लीं अनेक जाती, अनेक पंथ असल्यामुळें व सर्वांचा पृथक् पृथक् भाव असल्यामुळें ती जूट होणें अवघड आहे असें वाटतें.

आणि ह्या फंडाचे व्याजांतून निरंतर एक विद्यार्थी इतर खंडांतील देशांत अभ्यास करण्याकरितां राहिला असतां त्याचा निरंतर खर्च भागेल.

९. तथापि फक्त हिंदुस्थानांतच नाना जाती, नाना पंथ आहेत असें नाहीं, तर युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांतून सुद्धां एकंदर समाजांचें वर्गीकरण होऊन जनसमुदायाचे वेगवेगळाले तुकडे बनले आहेत. हिंदुस्थानांत जरी अनेक जाती आहेत तरी या सर्व जातींच्या लोकांशीं हल्लींच्या स्थितीस योग्य अशा एखाद्या देशकल्याणाच्या कामाकरितां आपण झटावें अशी मनाची प्रवृत्ति होणें अगदीं कठीण किंवा अशक्य गोष्ट आहे असें नाहीं. मात्र तसा योग जुळवून आणण्याचे कामीं यत्न करणें तो प्रांजलबुद्धीनें, शहाणपणानें, व थोड्या हिकमतीनें केला ह्मणजे झालें.

६. सदर हेतु सिद्ध झाल्यावर मग थोडेसें कार्य झाल्यासारखें होईल. आपल्यांतील तरुण विद्यार्थी परकीय देशांत जाऊन विद्याभ्यास आटोपून परत आले ह्मणजे ते दुसऱ्यांस आपण शिकलेली विद्या शिकवितील; किंवा परकीय राष्ट्रांमध्येंच राहून तेथील लोकांच्या बरोबरीनें कामें करूं लागतील. ज्या दिवशीं नेटिव्ह लोकांस समग्र विद्या व कला कौशल्य यांचें ज्ञान होऊन सुधारलेल्या राष्ट्रांची सर्वापरी बरोबरी करण्याचें सामर्थ्य आपणांमध्यें येईल व आपल्या राष्ट्राची सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें गणना केली जाईल तो मोठा सुदिन समजावयाचा.

---

## प्रसिद्धिपत्र.

पृथ्वीवरील सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकांप्रमाणें ज्ञान, ऐपत व सामाजिक रीतीभाती यांसंबंधानें आपणां हिंदु लोकांची स्थिति सुधारून त्या लोकांच्या बरोबरीला येण्याचा आतां आपण फार जरूर यत्न केला पाहिजे ही गोष्ट कोणीही कबूल करील. आपणांमध्यें उत्साह नाहीं, व आपल्या रीतीभाती, चाली वगैरे अशा आहेत कीं आपण पुढें जाऊं लागलों असतां त्या आपणांस मागें ओढतात, व यामुळेंच हल्लींची निकृष्ट स्थिति आपणांस प्राप्त [illegible]

तां चालेल. परंतु एक मोठी आनंदाची गोष्ट आहे ती ही कीं आपल्या आजापणजांच्या वेळेस जशी स्थिति होती तशी हल्लीं नाहीं. तिच्यामध्यें पुष्कळ फेरबदल झाला आहे. व जुन्या खुळया समजुतींचें व चालीरीतींचें प्रस्त झुगारून देऊन योग्य दिसेल तेंच करणारे असे प्रस्तुतकालीं एकदोनच पुरुष सांपडतात असें नाहीं तर अशा पुरुषांचीं अनेक उदाहरणें दृष्टीस पडत आहेत. या हल्लींचे समयीं पुष्कळ दिवस मनांत घोळत असणारे आमचे मनोरथ तडीस नेण्याकरितां आपण सर्वांनीं झटलें पाहिजे व तसें झटलें असतां ते मनोरथ सिद्धीसही जातील असें आह्मांस वाटतें. कलाकौशल्यामध्यें, विद्येमध्यें, वगैरे प्राविण्य जर मिळवावयाचें असेल तर आपल्या देशांतच स्वस्थ बसून उपयोग नाहीं; तर ज्या देशांमध्यें ज्ञानाचा मूळ उगम आहे व ज्या देशांतून विद्येचे व कलाकौशल्याचे झरे निघून दुसऱ्या देशांत वाहत चालले आहेत अशा देशांमध्यें आपण जाऊन त्यांच्या मूळ उगमाशीं विद्यामृत प्राशन केलें पाहिजे.

आतां ही गोष्ट तर निर्विवाद ठरली कीं आपणांस दुसऱ्या देशांत जाऊन विद्यामृत प्राशन केलें पाहिजे. आपला हेतु प्रत्यक्ष साधण्यास काय काय केलें पाहिजे हा प्रश्न पुढें येऊन उभा रहातो व या प्रश्नाचे निकालाकरितांच आह्मी **इंडियन फंडा**ची तजवीज काढली आहे.

आमची देशबांधवांस व विशेषेंकरून जिल्ह्या जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणच्या लोकांस करद्वय जोडून अशी प्रार्थना आहे कीं या यत्नास आपण मदत करावी व सदर प्रकारचा फंड जमविण्याची तजवीज सर्व देशभर प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं करावी. व ह्या प्रत्येक जिल्ह्याचे फंडाचा प्रसार सर्व तालुक्यानिहायही व्हावा. या मुंबई इलाख्यांतच २१ जिल्हे आहेत; तर प्रत्येक जिल्ह्यांतून फंडाची रक्कम किमान पक्षीं रु० ४०००० जमा होण्याची तजवीज करावी. व ह्या फंडाचे व्याजांतून एकएक उमेदवार पाश्चिमात्य देशांतून अभ्यास करण्याकरितां पाठवावा. मुंबई हें या इलाख्यामध्यें हरएक बाबतींत मुख्य शहर असल्यामुळें मुंबईकरांनीं या कामीं प्रमुखत्व पत्करिलें पाहिजे. व मुंबईकरांनीं प्रमुखत्व पत्करल्यावर मद्रासेंतील व कलकत्त्यांतील लोकही आपापल्या इलाख्यासंबंधानें पुढें सरसावतील. प्रत्येक इसमानें आपल्या एका महिन्याचे प्राप्तीवर कमींतकमी दर रुपयास अर्धा आणा वर्गणी दिली ह्मणजे झालें; आणखी ही वर्गणी वरचेवर देण्याची नसून फक्त एकवार द्यायची आहे. सर्वांस फार सोईवार पडावें ह्मणून मुद्दाम ही वर्गणी इतकी थोडी ठेविली आहे, व या इतक्या थोड्या वर्गणीनें सुद्धां आपलें कार्य हवें तसें होईल. मात्र आपल्यापैकीं कांहींजणांनीं कंबर बांधून सदरच्या उद्योगापासून होणारे फायदे सर्व लोकांस समजून देण्याविषयीं व त्यांस वर्गणीदार करण्याविषयीं झटलें पाहिजे, व त्याप्रमाणेंच सरासरीनें दर इसमापासून एक रुपया याप्रमाणानें प्रत्येक जिल्ह्यांतून ढोबळमानानें ४०००० लोकांपासून वर्गणी घेऊन फंडाची रक्कम उभी केली पाहिजे. सर्व लोकांनीं या उद्योगास आपल्या शक्तीनें हात लाविल्यानें जसा तो सफल होईल तसा कांहीं थोड्या लोकांनीं मो-

च्या औदार्यानें बडी बडी वर्गणी देऊनही व्हावयाचा नाहीं. वर्गणी मिळविण्याचें काम फार सुलभ जावें ह्मणून सब्सेक्रेटरी नेमण्याचें योजिलें आहे. प्रत्येक सब्सेक्रेटरीनें आपले जेवढे इष्टमित्र असतील तेवढ्यांपासून वर्गणी मिळविली असतां कार्यभाग तेव्हांच उलगडेल. वर्गणीचा पैसा एकदम व्याजीं लागावा याबद्दल ही सोय करण्यांत आली आहे, ती ही कीं प्रत्येक सब्सेक्रेटरीनें किंवा वर्गणीदारानें पुढें नमूद केलेल्या व्यांकांपैकीं पाहिजे त्या व्यांकेकडे आपला वर्गणीचा जमा झालेला पैसा पाठवावा. व व्यांकेची पावती मिळेल तिच्यासोबत वर्गणीदारांची याद जोडून सेक्रेटरीकडे ती पावती व याद पाठवावी, ह्मणजे सेक्रेटरी वर्गणी पोंहोचल्याचे दाखले ज्यांचे त्यांस पावते करण्याची तजवीज करतील.

इंडियन फंडाच्या उत्पादकांनीं हा मोठा स्तुत्य उद्योग आरंभिला आहे एवढेंच ह्मणून आमचे देशबांधव स्वस्थ राहणार नाहींत, तर ते वर्गणीच्या योगानें, तसेंच वेळोवेळीं सल्लामसलत देऊन हरएक प्रकारें आह्मांस मदत करतील, व यथाशक्ति स्वदेशसेवा करून हा अल्पस्वल्प उद्योग सिद्धीस नेण्यास मनापासून झटतील अशी आमची पूर्ण आशा आहे. आतां फंड जमविण्याविषयींचे व त्याची व्यवस्था करण्याविषयींचे नियम केले आहेत ते आह्मी सादर करितों.

---

## इंडियन फंडाचे नियम.

### मुख्य व कधीं ही बदलतां न येणारीं मूलतत्वें :—

१. फंडाचा विनियोग हिंदुस्थानांत अगर दुसऱ्या देशांत फक्त विद्यावृद्धीकडे करावयाचा.

२. सदर कामासाठीं मुद्दलास हात न लावितां सर्व आवश्यक खर्च व्याजांतून भागविणेंचा.

३. उमेदवारास हिंदुस्थाना शिवाय इतर देशांतील स्त्रीशीं विवाह करण्याचा प्रतिबंध असावयाचा.

### फंड उभारण्याची तजवीज.

१. या देशांतील प्रत्येकजण ज्यास हिंदुस्थानचा नेटिव्ह असें म्हणतात त्यास वर्गणीदार होण्याविषयीं विनंती करावी. व त्यानें आपल्या महिन्याच्या प्राप्तीवर रुपया पाठीमागें निदान अर्धा आणा दिला म्हणजे तो वर्गणीदार होऊं शकेल. ज्यांस दरमहा पगार किंवा पगारासारखें दुसरें नियमित उत्पन्न नाहीं त्यांनीं सरासरीनें सदरचें प्रमाण मनांत आणून वर्गणी द्यावी.

२. सर्व नेटिव्ह लोकांस ह्मणजे सर्व एतद्देशीय लोकांस किंवा जे लोक मूळ दुसऱ्या देशांतून आले तरी या देशांत ज्यांनीं निरंतर वस्ती केली आहे अशा लोकांस वर्गणीदार होतां येईल.

३. फंडाची व्यवस्था जनरल कमेटी म्यानेजिंग कमेटीच्या मदतीनें ठेवील.

४. जितके म्हणून वर्गणीदार तितके सर्व जनरल कमेटीचे सभासद समजावयाचे. व या जनरल कमेटीकडूनच कामगार मंडळीच्या ह्मणजे अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे यांच्या नेमणुका केल्या जातील, व सेक्रेटरीची नेमणूक ही जनरल कमेटी करील. सब सेक्रेटरींच्या नेमणुका मात्र वर्गणी जमविण्याचे व पावत्या देण्याचे कामीं मदतीस्तव सेक्रेटरी यांजकडून केल्या जातील.

५. वर्गणी गोळा करण्याचें व नोंदण्याचें काम हें सेक्रेटरी व सब सेक्रेटरी यांनीं आपसांत करावें. नोंदणी वगैरे करणें ती पसंत केलेल्या रजिस्टरबुकांत करावी.

६. वर्गणीदारानें वर्गणी दिल्या मितिपासून त्यास सर्व हक्क मिळेल. तो हक्क म्हटला म्हणजे आपला मुलगा, भाऊ, किंवा निराश्रित, बाप मेलेली असा एखादा नातेवाईक यांस हिंदुस्थानांत किंवा इतर देशांत विद्याभ्यास पुरा करण्याकरितां उमेदवारांमध्यें दाखल करणें हा होय.

७. निरनिराळ्या मुख्य जातीचे लोकांची एक कमेटी नेमून ही कमेटी उमेदवारांची निवड करील. त्या कमेटीचें नांव सिलेक्ट कमेटी. ही कमिटी प्रतिवर्षी जनरल कमिटी कडून नेमिली जाईल. जेव्हां उमेदवारांचे गुण अगदीं सारखे भरतील तेव्हां चिठ्या टाकून निवड करण्यांत येईल.

८. वर्गणीदार मयत झाला असतां उमेदवार दाखल करण्याचा हक्क त्याचे वारसास आहे.

९. वर्गणी दिल्याबद्दल वर्गणीदार यांस एक पावती मिळेल; या पावतीवर सेक्रेटरी व सबसेक्रेटरी या दोघांचीही सही असून फंडाचा छाप मारिला जाईल.

१०. ज्याची वर्गणीदार होण्याची खुषी नसेल त्यानें वाटेल तर देणगी दाखल कांहीं रकम दिल्यास तिचा स्वीकार केला जाईल.

११. आपलें स्वतःचें किंवा दुसरे कोणाचें नांव चिरायु रहावें अशा करितां कोणा एखाद्यानें इन्डियन फंडाच्या मार्फत एखादें बक्षिस अगर एखादी स्कालरशिप-हिंदुस्थानांत किंवा इतर देशांत चालणारी अशी दिल्यास ती इन्डियन फंड कमेटीकडून दिली जाईल; फक्त इतकेंच कीं बक्षिस अगर स्कालरशिपच्या रकमे इतकें व्याज दरसाल उत्पन्न होईल एवढें मुद्दल त्यानें फंडाकडे दिलें पाहिजे. मुद्दल देतेवेळीं त्यानें आपल्या अटी कळवाव्या. त्या पसंत पडल्यास त्याप्रमाणें वागणूक होईल. तसेंच मर्जी असल्यास त्यानें आपल्या स्वतःच्या खर्चानें एक छाप ( seal ) तयार करवून फंडाचे सेक्रेटरीकडे दिला असतां त्याचा छापा इन्डियन फंडाचे छाप्याबरोबरच बक्षिस अगर स्कालरशिप पत्रकावर मारला जाईल.

१२. सबसेक्रेटरीकडे वर्गणी दिल्यावर सेक्रेटरीकडून नमुन्याबरहुकूम पावती येईतोंपर्यंत पाहिजे असल्यास वर्गणीदारास सबसेक्रेटरीनें हातपावती द्यावी.

१३. एका वर्गणीदारास दोहोंपेक्षां अधिक जिल्ह्याच्या ठिकाणीं म्हणजे दोनदांपेक्षां अधिक वेळां वर्गणीदार होण्यास मनाई आहे. त्यानें वाटल्यास इतर ठिकाणीं वर्गणी नभरतां देणगीदाखल रकम दिल्यास द्यावी.

१४. हिंदुस्थानांतील लोकांचे मुख्य भेद चार समजले जातील—१ हिंदु, २ मुसलमान, ३ पारसी, ४ ख्रिस्ती.

१५. दोन रजिस्टरें ठेवावीं, पैकीं एक सेक्रेटरीनें भरण्याचें व दुसरें सबसेक्रेटरीनें भरण्याचें.

१६. इंडियन फंडाच्या शिक्क्याचा नमुना खालीं दाखविल्याप्रमाणें. हा नमुना इतर ठिकाणच्या लोकांनीं ही घ्यावा. जिल्ह्याचें नांव शिक्क्याच्या मध्यभागीं असलें म्हणजे झालें. त्याप्रमाणें:—

| | |
|---|---|
| INDIAN FUND.<br>Nassik.<br>नासिक.<br>इंडियन फंड. | INDIAN FUND.<br>Poona.<br>पुणें.<br>इंडियन फंड. |

## फंडाची व्यवस्था.

१७. सदर कामीं फंड जमा होईल त्यास इंडियन फंड म्हणावें.

१८. फंडाचा पैसा जमा होईल त्याच्या सरकारी नोटा ( Government Loans ) विकत घ्याव्या आणि सदर पैसा फंडाच्या ट्रस्टीच्या नांवानें व्याजीं लावावा.

१९. हिंदुस्थानांत अगर दुसरे देशांत राहून अभ्यास करण्याकरितां ज्यांस स्कॉलरशिपा देण्याचें ठरेल त्यांस फंडाच्या फक्त व्याजांतून स्कॉलरशिपा दिल्या जातील.

२०. परदेशांत राहून अभ्यासास पुरे इतकी व्याजाची रकम होईतों पर्यंत हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच जे उमेदवार उत्तम ठरतील त्यांस बक्षिस अगर स्कालरशिपा दिल्या जातील, पण सदर

उमेदवार हे नियमाप्रमाणें वर्गणीदारांचे नातलग असले पाहिजेत. बक्षिसें अगर स्कालरशिपा कशा द्यावयाच्या याच्या समजुतीकरितां उदाहरणें:—

**अ**. जर व्याजाची रकम दरमहा रुपये चारच झाली जास्त झाली नाहीं, तर तिचा विनियोग ज्या विद्यार्थाचा थोडासाच अभ्यास झाला आहे अशा विद्यार्थ्यास स्कालरशिप देण्याकडे करावा.

**ब**. दरमहा व्याज चाळीस रुपये उत्पन्न होऊं लागेल तर तेवढ्याची स्कालरशिप जो उमेदवार उत्तम ठरून कलाकौशल्य शिकेल, किंवा एखादा धंदा अगर शास्त्रीय विषयाचा अभ्यास करील त्यास द्यावी, किंवा दुसऱ्या कोणत्यारीतीनें सदर रकमेचा उपयोग जनरल कमेटीस उत्तम रितीनें होईल असें वाटेल तर त्याप्रमाणें व्हावा.

**क**. जेव्हां व्याजाची रकम दरमहा दीडशें अगर दीडशांहून अधिक रुपये उत्पन्न होऊं लागेल तेव्हां हिंदुस्थानांत कोणाही उमेदवारास स्कालरशिप न देतां त्याबदला दुसऱ्या देशांत अभ्यास करण्याकरितां उमेदवार पाठवून त्यास एक किंवा अधिक स्कालरशिपा द्याव्या.

२१. फंडाचें व्याज उत्पन्न होईल त्याच्या व्यवस्थेचें काम जनरल कमेटी व म्यानेजिंग कमेटी यांनीं उभयतां मिळून करावे.

२२. जनरल कमेटीचे सभासद सर्व वर्गणीदार समजावे. म्यानेजिंग कमेटीचे सभासद व सेक्रेटरी जनरल कमेटी ज्यांस नेमील ते समजावें.

२३. सोलापूर जिल्ह्याची जनरल कमेटीची सभा वर्षातून दोनदां सोलापूर येथें नेटिव्ह लायब्ररीमध्यें दुपारीं चार वाजतां भरत जाईल ; पहिली, जून महिन्यांत दुसरे रविवारीं; व दुसरी दिजंबर महिन्याचे दुसरे रविवारीं ; म्यानेजिंग कमेटीची सभा दर महिन्यास पहिले रविवारीं दुपारीं चार वाजतां सदर ठिकाणींच भरत जाईल.

२४. दिजंबर महिन्यांत जनरल कमेटीची जी सभा भरेल त्या सभेमध्यें त्या सालीं सदर महिना अखेरपर्यंत फंडाचें जें व्याज होईल त्याची वासलात काय करावी त्याचा विचार बहुमतानें केला जाईल.

## उमेदवारांच्या संबंधानें शर्ती.

२५. उमेदवार हिंदुस्थानांतील असला पाहिजे.

२६. उमेदवार हुशार असून त्याचें वय पंचवीस वर्षापेक्षां जास्त असतां उपयोगी नाहीं.

२७. बक्षिस अगर स्कालरशिपा करितां उमेदवार हजर करण्याचा ज्यास हक्क आहे अशा वर्गणीदारानें आपल्या उमेदवाराचें नांव सेक्रेटरी यांस प्रतिवर्षी दिजंबर महिन्याचे आंत पत्र पाठऊन कळवावें. पत्रा सोबत उमेदवाराचा अभ्यास वगैरे सरटिफिकिटांत दाखल करून त्यावर एखाद्या संभावित गृहस्थाची सही घेऊन सरटिफिकीट पाठवावें, ह्मणजे सदर उमेदवाराचें नांव, गुण, अभ्यास वगैरे सेक्रेटरी हे सिलेक्ट कमेटी पुढें निकाला करितां ठेवितील.

२८. स्कालरशिप ही नियमित काळपर्यंत दिली जाईल. उमेदवारांच्या अभ्यासावर देखरेख सिलेक्ट कमिटीची राहील; तो परदेशांत असेल तर सिलेक्ट कमिटीचे एजंटाची राहील.

२९. कांहीं कारणांवरून एखाद्या उमेदवाराची वर्तणूक असावी तशी नाहीं असें सिलेक्ट कमिटीच्या नजरेस आल्यास लागलींच त्यास मिळत असलेला पगार म्यानेजिंग कमिटीच्या मंजुरीनें बंद केला जाईल.

३०. ज्या शास्त्रीय विषयाचा अगर कलेची उमेदवारांस स्वभावत: आवड असेल तो विषय अगर ती कला शिकण्यास पुष्कळ अंशीं उमेदवारांस मुकत्यारी आहे; तथापि प्रस्तुत काळीं ज्या उमेदवारांची कलाकौशल्य शिकण्याची मर्जी आहे अशा उमेदवारांस मात्र स्कालरशिप दिली जाईल.

३१. उमेदवारास पगार देणें तो त्याचा अभ्यास किंवा आप्रेंटिसची मुदत होईपर्यंत पगार दिला जाईल, परंतु त्यानें एतद्देशीय शिवाय करून परदेशीय स्त्रीशीं लग्न लाविल्यास किंवा अभ्यासाची मुदत संपण्याचें अगोदरच अभ्यास सोडून दिल्यास त्याचा पगार बंद करण्यांत येईल.

३२. पगार देणें तो फार झालें तर पांच वर्षापर्यंत देण्यांत येईल.

३३. ज्या उमेदवाराचा कमी प्रतीचे शिक्षणाचा क्रम पुरा झाला असेल, ह्मणजे उदाहरणार्थ ज्याची म्याट्रिक्युलेशन किंवा त्यासारखी दुसरी एखादी परीक्षा उतरली असेल, असाच उमेद-

वार परदेशांत राहून अभ्यास करण्याकरितां निवडला जाईल व त्यास पगार मिळेल ; आणखीं तो प्रकृतीनें सुदृढ असून परदेशांतील हवा पाणी त्यास सोसण्यास ताकद पाहिजे किंवा दुसऱ्या कित्येक गोष्टींच्यासंबंधानें त्यास सिलेक्ट कमिटीनें पसंत केलें पाहिजे.

३४. एतद्देशीय स्त्रीयांशिवाय दुसऱ्या स्त्रीशीं विवाहसंबंध करूं नये ह्या अटीपासून मुक्त होण्याची उमेदवारास एखादेवेळीं इच्छा झाल्यास त्यानें त्यावेळेपर्यंत मिळालेल्या पगाराचा सर्व पैसा परत दिला पाहिजे; व ही शर्त ज्यास कबूल असेल म्हणजे ह्या शर्तीप्रमाणें मी जन्मभर वागेन असें जो लिहून देईल त्यासच पगार दिला जाईल.

३५. इन्डियन फंडाचे नियमांमध्यें फेरफार करण्यास ह्मणजे पूर्वींचे नियम रद्द करण्यास किंवा नवीन नियम करण्यास जनरल कमिटीस पूर्ण अधिकार आहे ; परंतु मूलतत्वें नेहमीं कायम राखण्यांत आलींच पाहिजेत.

---

## सोलापूर इन्डियनफंड कमिटीच्या जनरल व म्यानेजिंग कमिटी यांनीं केलेल्या कामांचा गोषवारा.

सोलापूर, ता० १ एप्रिल सन १८८३ इ०.

तारीख १ एप्रिल सन १८८३ इसवी रोजीं इन्डियनफंडाचे कामास सोलापूर मुक्कामीं प्रारंभ झाला, व सोलापूर जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांतून या फंडाची वर्गणी जमा करावी असा बेत ठरला. एप्रिल महिन्यांतील पहिला रविवार पहिल्या तारखेस आल्यामुळें त्या दिवशीं तिसरे प्रहरीं चार वाजतां फंडाच्या व्यवस्थापक मंडळीच्या उपयोगाकरितां तयार केलेल्या नियमाप्रमाणें म्यानेजिंग कमिटीची पहिली सभा सोलापूर नेटिव जनरल लायब्ररींत भरली. सदर सभेस गांवांतील वजनदार मंडळीचा बराच समुदाय जमला होता.

फंडाची व्यवस्था आणि बंदोबस्त करण्याकरितां व वर्गणी वसूल करण्याकारितां जे नियम पूर्वी केले व पसार झाले त्यांची छापील प्रत वाचण्यांत आली व ते नियम कायम ठरले, व पूर्वींच्या प्रसंगीं ज्या कामगारांच्या नेमणुका केल्या होत्या त्याही कायम ठरल्या. त्या खालीं लिहिल्याप्रमाणें.

### अध्यक्ष.

१. रा. रा. वीरचंद दीपचंद, सोलापूर मिलचे एजंट.

### उपाध्यक्ष.

१. रा. रा. पांडुरंगराव लिंगुडे जहागीरदार, सांगोलें.
२. रा. रा. मल्लापा वारद.
३. रा. ब. आपाजी रावजी, पेनशनदार डे. कलेक्टर.
४. रा. रा. नारायण गोविंद वकील.
५. रेवरेंड ए० डी० मांटी.
६. रा. रा. दिनकरपंत चक्रदेव वकील.

### खजीनदार.

१. रा. रा. वीरचंद दीपचंद.
२. रा. रा. आण्णाजी अनंदराव वकील.
३. रा. ब. अपाजी रावजी.
४. मे. तयबअली फताभाई, व्यापारी. मे.दो.

### जाइन्ट सेक्रेटरी.

१. रा. रा. व्यंकटेश दत्तात्रय, पेनशनर सबरजिस्ट्रार (जबाबदार सेक्रेटरी).
२. रा. रा. गणेश जिवाजी केळकर.

### पेढीवाले.

१. सोलापूर पोस्टल ब्यांक.
२. बांबे ब्यांक.

## फंडाची व्यवस्था करणारी मंडळी.

**जनरल कमिटी**—सर्व वर्गणीदारांची कमिटी म्हणजे जनरल कमिटी ह्मणावयाची व ती वर्षांतून दोनवेळ ह्मणजे जून महिन्याच्या दुसऱ्या रविवारीं व त्याचप्रमाणें दिसेंबरच्या दुसऱ्या रविवारीं भरावी. सरसालांत जी व्याजाची ह्मणून रकम जमा जाहली असेल तिची व्यवस्था कशी करावयाची याविषयींचा विचार दिसेंबरच्या जनरल मिटींगमध्यें होईल.

**म्यानेजिंग कमिटी**—सर्व सबसेक्रेटरी, कामकरणारे गृहस्थ व ज्या दुसऱ्या सभासदांची निवडणूक होईल ते सर्व लोक यांची म्यानेजिंगकमेटी ह्मणावयाची, व ती दर महिन्याचे पहिले रविवारीं भरत जाईल. वर नेमलेले कामगार मंडळीमध्यें आणखी चारलोक ज्यास्ती घातले जातील.

**सिलेक्ट कमिटी**—हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातीच्या लोकांपैकीं हुषारलोकांची सिलेक्ट कमिटी ठरविली जाईल. व सदर कमिटी उमेदवार लोकांची जरूर पडेल तेव्हां भरत जाईल.

सोलापूर येथील जिल्हा कमेटीची रचना सदर कमेटीचें मुख्य ठिकाण जरी सोलापूर आहे तथापि त्यामध्यें या जिल्ह्यांतील सर्व तालुक्याचीं शहरें व खेडीं यांचा समावेश होतो. आणि सोलापूर हें जरी या कामाचें मुख्य ठिकाण आहे तथापि ह्याकामास चांगली मदत व्हावी म्हणून एथल्याप्रमाणेंच प्रत्येक तालुक्यांत ह्याचप्रमाणें काम करणारी मंडळी असावी हें इष्ट आहे. हिंदुस्थानांतील कोणाही मनुष्यास सोलापूरचे सदर फंडाचे वर्गणीदार होतां येईल व त्यास सदरचे सर्व हक्क मिळतील व तो वर्गणीदार झाल्यावर आपलें ठिकाण सोडून जाईल तरी त्याचे हक्क तसेच कायम राहतील.

---

## म्यानेजिंगकमिटीनें ता. ३ सप्टंबर सन १८८२ इसवी पर्यंत केलेल्या कामाचा गोषवारा.

सोलापूर येथील नेटिव्ह जनरल लायब्ररीमध्यें म्यानेजिंगकमेटीची सभा दरमहा हिशेबाची तपासणी करणें वगैरे कामाकरितां भरत आली. सोलापूर जिल्ह्यांतील पंढरपूर, करमाळें, माढें, बार्शी वगैरे तालुक्याचे ठिकाणीं फंडाचे सब सेक्रेटरीही वेळोवेळीं नेमण्यांत आले. वेगवेगळ्या जिल्ह्याचे ठिकाणचे वजनदार गृहस्थ लोकांस हा मजकूर कळवून त्यांनींही अपापल्या हद्दीमध्यें अशा प्रकारच्या उद्योगास सुरवात करावी, ह्मणून सूचना करण्यांत आल्या, व त्याप्रमाणें ठाणें, धुळें, पुणें, सातारा, कलादगी, बडोदा, गोवें, अमदाबाद, सुरत, बेळगांव, अहमदनगर, आणि दुसऱ्या कितीएक जिल्ह्याचे शहरांतील लोकांनीं अपापल्या हद्दीमध्यें अशा प्रकारच्या उद्योगास प्रारंभ करावा म्हणून विनंति करून मुंबई, मद्रास, आणि कलकत्ता, येथील लोकांसही त्यांनीं अपापल्या इलाख्यामध्यें ह्या कामाच्या संबंधानें हालचाल करण्याविषयीं सूचना करण्यांत आल्या. सोलापूर इंडियनफंडाचें खातें मुंबईच्यांकेंत ठेविलें आहे तर ह्या फंडास मदत करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं दहा रुपयापर्यंत किंवा दहा रुपयांवर रकम देणें असल्यास ती रकम परभारें मुंबईच्यांकेंत भरण्याची मेहेरबानी करावी, आणि मुंबईच्यांकेची पावती सोलापूर इंडियनफंडाचें सेक्रेटरी यांजकडे आपलें नांव व दिलेल्या रकमेचा आंकडा यासुद्धां पाठवावी ह्मणजे सेक्रेटरीस वर्गणीदारांची सर्टिफिकिटें वर्गणीदारांस पाठविण्यास ठीक पडेल; किंवा मुंबईच्यांकेंत परभारें न भरतां आपली वर्गणी कोणत्याही सबसेक्रेटरीकडे भरली असतां हरकत नाहीं.

## ता० १० दिसेंबर सन १८८३ इसवी रोजीं जनरल कमेटी भरली त्यावेळीं झालेल्या कामाची हकीकत.

सदर सभा सोलापूर येथील नेटिव्ह जनरल लायब्ररींत भरली, त्यावेळेस व्यांकेंत असलेल्या रकमेच्या व्याजांतून ४० रुपये पुढील सालच्या स्कालरशिपाकरितां देतां येतील असें कळविण्यांत आलें. पूर्वीं सांगितलेल्या हिंदु, मुसलमान, पारशी, व क्रिश्चियन या चार जातींतून एकेक उमेदवार निवडून काढून त्यांमध्यें ती रकम वांटून द्यावी असें ठरलें. रा. रा. नारायण गोविंद, पांडुरंगराव लिंगुडे, अण्णा आनंदराव, मुनसी बाबन, मे. काजी सुलताना, मे. फ्रॉमजी हार्मसजी, नानाभाई नवरोजी, फादर डी. मांन्टी, फादर डि सौजा यांची सिलेक्ट कमिटी नेमिली, व त्या कमिटीनें उमेदवारांची निवड करावी असें ठरलें.

---

## सन १८८४ इसवी सालाकरितां स्कॉलरशिप देण्यास पुढील चार उमेदवार काढिले.

| | |
|---|---|
| १ चनबस अप्पा शरणप्पा. | १ शेख दाऊद. |
| १ फेरोजशहा फ्रॉमजी. | १ व्हिक्टर डिसोजा. |

---

## ता० १४ डिसेंबर सन १८८४ इसवी रोजीं भरलेल्या जनरल कमिटीनें केलेल्या कामाची हकीकत.

सदर सभा सोलापूर येथील नेटिव जनरल लायब्ररींत भरली. अध्यक्ष गैर हजर असल्यामुळें रावबहादुर अप्पाजी रावजी यांची अध्यक्षस्थानीं नेमणुक होऊन कामास सुरवात झाली.

१. गेल्या वर्षाचा एकंदर हिशेब सेक्रेटरींनीं सभे पुढें हजर केला. तो हिशेब दुरस्त आहे असें पाहिल्यावर सर्वांच्या मतें पसंत ठरून पास झाला.

२. इलाख्यांत चालू असलेल्या भाषांपैकीं मुख्य चार भाषांमध्यें म्हणजे मराठी, गुजराथी, उर्दू व कानडी या भाषांमध्यें इंडियन फंडाच्या प्रसिद्धिपत्राचें भाषांतर छापवावें असें ठरलें.

३. चालू सालच्या अखेरपर्यंत जमलेल्या वर्गणीच्या व्याजापैकीं निम्मी रकम चार जातींतील एक एक उमेदवारास एक एक याप्रमाणें चार उमेदवारांस चार बक्षिसें देण्याकडे खर्चावी व बाकीची रकम प्रसिद्धिपत्र छापविण्याकडे खर्चावी असें ठरलें.

४. चालू असलेल्या नियमांमध्यें ११ नंबरचा नियम सामील करावा.

५. इंडियन फंडाचे प्रसिद्धिपत्रांत सांगितल्याप्रमाणें कायदेशीर रीतीचें एक ट्रस्टडीड तयार करवावें.

६. गेल्या वर्षाच्या नेमलेल्या सिलेक्ट कमिटीच्या सभसदांची साल मजकूरच्या सिलेक्ट कमिटीमध्यें पुनः नेमणूक करावी.

७. सोलापूर येथील इंडियनफंडाचे उत्पादक व आश्रयदाते या सर्वानुमते अंतःकरणपूर्वक आभार मानण्यांत आले.

येणेंप्रमाणें कामें झाल्यावर सभा बिसर्जन झाली.

---

## १८८५ सालाकरितां ज्या उमेदवारांस बक्षिसें मिळालीं ते येणेंप्रमाणें :—

| नंबर. | मुलांचीं नांवें. | जात. | ज्या शाळेंत अभ्यास केला तिचें नांव. | राहण्याचें ठिकाण. |
|---|---|---|---|---|
| १ | रस्तमजी पेस्तनजी. | पार्शी. | लोणावळें येथील इंग्रजी शाळा. | लोणावळें. |
| २ | रावजी लक्ष्मण काळे. | मराठा. | सोलापूर येथील मराठी शाळा नंबर १. | सोलापूर. |
| ३ | पास्कल डी सूझा. | ख्रिस्ती. | सोलापूर हायस्कूल. | सोलापूर. |
| ४ | शेक महमद इसाहक. | मुसलमान. | आनजुमानी इसलाम, मुंबई. | मुंबई. |

**विनंति.** हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं सदर कामास देणग्या, वर्गणी, उपयुक्त सल्ला व मदत द्यावी अशी इंडियन फंडाचे म्यानेजिंग कमेटीची सर्व लोकांस विनयपूर्वक सूचना आहे.

सदर उद्योगाचा होईल तितका फैलाव व्हावा या हेतुनें हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या प्रांतांतील लोकांनीं सदर हकीगतीचा तर्जुमा वेगवेगळ्या देशभाषेंत करावा अशी म्यानेजिंग कमिटीची सूचना आहे.

सोलापूर इंडियन फंडाचे म्यानेजिंग कमिटीचे आज्ञेवरून

**व्यंकटेश दत्तात्रय.**
**गणेश जिवाजी केळकर.**
सेक्रेटरी.

---

## नमुने.

### वर्गणीदारांस देण्याच्या सर्टिफिकिटांचा नमुना.

Indian Fund certificate. Zilla Circle.
इंडियनफंडाचा दाखला. जिल्हा सरकल ( सोलापूर ) ता०

Genl. Reg. No Sub-Secy's Reg. No.
जनरल रजिष्टर नंबर० [ ] सब-सेक्रेटरीचें रजिस्टरबुक नंबर. [ ]

Serial No.
अनुक्रम नंबर. [ ]

Certified that Mr. Taluka Zilla has
दाखला देण्यांत येतो कीं, रा. रा. तालुके. जिल्हा. यांनीं
paid in Rs. to the above Fund. Date
आपली वर्गणी रुपये वरील फंडाबद्दल दिली. ता० सन १८० इसवी.

Sub-Secy's sig. Secy's. sig.
सबसेक्रेटरीची सही. सेक्रेटरीची सही.

## रकमा पाठविते वेळीं ब्यांकेस पत्र पाठविणें त्याचा नमुना.

मुक्काम. ता० सन .

मे० मुंबई ब्यांकचे म्यानेजर मु० मुंबई यांस,

या पत्राबरोबर पाठविलेली रकम किंवा हुंडी सोलापूर (किंवा तालुका वगैरे असेल तसें) इंडियन फंडाचे नांवें जमा करून व त्यांबद्दल पावती पाठविण्याची मेहेरबानी करावी.

रकमा पाठविणारांचा पत्ता. सही.

---

## सब सेक्रेटरी किंवा वर्गणीदार होऊं इच्छिणारानें इंडियन फंडाचे सेक्रेटरीस पाठविण्याचे पत्राचा नमुना.

(अ.)

या पत्रा सोबत रकम रुपये (१० किंवा त्यांहून अधिक) किंवा मुंबई ब्यांकेची सदर रकमेबद्दलची पावती पाठविली आहे. सदर रकम खालीं लिहिलेल्या वर्गणीदारांकडून आली आहे.

**सब सेक्रेटरीचें बुक नंबर.** **सब सेक्रेटरीचें नांव.**

| नंबर. | वर्गणीदाराचें नांव. | मुक्काम. | रकम. | करन्सी नोटेचा नं० किंवा ब्यांकेचें पत्रनं० | वर्गणी आल्याची ता० |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

सदर कामांत जरूर असलेले दाखले मेहेरबानीनें देण्यांत यावे.

**सही.**

**सूचना**—ज्या वर्गणीदारांनीं परभारें ब्यांकेमध्यें रकम भरली असेल त्यांनीं फक्त आपलीं नांवें व ब्यांकेची पावती, इंडियनफंडाच्या सेक्रेटरीकडे पाठवावी.

Form of Register to be kept by the Sub-Secretary to the Indian Fund.

## इंडियनफंडाचे सब सेक्रेटरी याच्या रजिष्टरबुकाचा नमुना.

( ब. )

| Year वर्ष. | Month. महिना. | Date. तारीख. | Number. नंबर. | Subscriber's Name, Designation, Profession &c. वर्गणीदाराचें नांव, हुद्दा, धंदा वगैरे . | Place of Residence. राहण्याचें ठिकाण. | Amount of Subscription. वर्गणीची रक्कम. In words. अक्षरीं. | Amount of Subscription. वर्गणीची रक्कम. In figures. अंकीं. | Date of payment of Subscription. वर्गणी दिल्याची तारीख. | Sub-Secretary's counter signature. सब सेक्रेटरीची सही. | Date of remittance of amount to the Secy. or to the Bank. सेक्रेटरीकडे किंवा बँकेकडे रक्कम पाठविल्याची तारीख. | Genl. Reg. No. जनरल रजिस्टर नं. | Certificate when issued to Subscriber. वर्गणीदारास दाखला दिल्याची तारीख. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | |

(क.)

Secreary's Name
सेक्रेटरीचें नांव.

Form of Register to be kept by the Sercetary, Indian Fund.

**इंडियनफंडाचे सेक्रेटरीच्या बुकाचा नमुना.**

Indian Fund Secretary's Register
इंडियनफंडाच्या सेक्रेटरीचें रजिष्टर.

Zilla Circle
जिल्हा सरकल.

| General No. जनरल नंबर. | Sub-Secy. Book No. स० सेक्रे० बुकाचा नंबर. | Sub-Secretary's name. सब सेक्रेटरीचें नांव. | Subscriber's name and Designation. वर्गणीदाराचें नांव व हुद्दा. | Place of Residence. राहण्याचें ठिकाण. | Amount of Subscription. वर्गणीची रकम. | | Date of receipt of amount by the Secy. or of remittance to the Bank. रकम दिल्याची अगर ब्यांकेंत ठेवल्याची तारीख. | Date of deposit of amount in Bank. ब्यांकेंत ठेवल्याची तारीख. | Certificate when issued to Sub-Secretary. सब सेक्रेटरीस दाखला दिल्याची तारीख. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | In figures. अक्षरीं. | In words. अंकीं. | | | |
| | | | | | | | | | |

**वर्गणीदाराचे हक्क न मागतां फक्त या फंडास देणगीदाखल ज्यांस रकम देणें असेल त्यांनीं आपल्या रकमेबरोबर सेक्रेटरीस पाठविण्याचे पत्राचा नमुना.**

इंडियन फंडाचे सेक्रेटरी जिल्हा सरकल यांस.

सोलापूर इंडियन फंडास देणगीदाखल दिलेल्या रकमेची पावती पाठविली आहे ती पावल्याबद्दल मेहेरबानी करून उत्तर पाठवावें.

सही.

---

## बक्षिस मिळाल्याबद्दलचा दाखला.

Indian Fund Prize for 188 . Zilla Circle Sholapur.
सन १८८ सालाकरितां इंडियन फंडाचें बक्षीस. जिल्हा सर० सो०

Awarded to Mr. provided he proves himself deserving of it by his diligence, assiduity and good conduct.

वरील बक्षीस रा० रा० ह्यास देण्यांत आलें आहे; परंतु त्यानें आपल्या अभ्यासानें, मेहेनतीनें, आणि चांगले वागणुकीनें लायकी दाखविल्यास मात्र हें बक्षीस चालू राहील.

---

## बक्षिस मिळण्यालायख वर्तणूक ठेविल्याबद्दलचा दाखला.

Certified that Mr. has behaved himself according to the above terms of the above award during the year he held it.

दाखला देण्यांत येतो कीं रा० रा० यानें वर लिहिल्याप्रमाणें आपली स्थिति या सालांत ठेविल्यावरून तो बक्षिसास पात्र झाला आहे.

Seal.
सील.

Secy. Indian Fund
सेक्रेटरी, इंडियन फंड.

Agent to the Managing Committee, Indian Fund.
इंडिअन फंडाच्या म्यानेजिंग कमिटीचे एजंट.